# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक बांधकाम विभाग,
# दक्षता व गुणनियंत्रण मंडळ,
# नाशिक

# नागरिकांची सनद

# २०२३

**CITIZEN'S CHARTER- २०२३**

# सुची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावाना | १ |
| २ | मंडळाची बांधीलकी व नागरीकांची जबाबदारी | २ |
| ३ | मंडळाची रचना | ३ |
| ४ | मंडळाची वार्षिक उद्दीष्टे | ३(१) |
| ५ | प्रयोगशाळा व प्रशिक्षण | ३(२) |
| ६ | कार्यपुर्तीचे वेळापत्रकए गा-हाण्यांचे निराकरण व सनदेचा आढावा | ४ |
| ७ | सनदेची अमल बजावणी | ४ |
| ८ | परिशिष्ट अ व ब. | ५ |

**१.प्रस्तावाना :-**

दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक या कार्यालयाची स्थापना दि. १४ मार्च १९९० रोजी करण्यात आलेली आहे. दिनांक १ एप्रिल १९९० पासून या मंडळाचे कामकाज सुरु झालेले आहे.

दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांचे कार्यक्षेत्रात नाशिक, जळगांव, अहमदनगर, धुळे, नंदुरबार या पाच जिल्हांचा समावेश आहे.

हे मंडळ कार्यालय नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधीलकी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक या सनदेव्दारे जाहीर करित असुन, ती स्विकारत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक वागणुक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे प्रश्न सहानभुतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन ही सनद तयार करतांना नजरे समोर ठेवला आहे.

१. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तसेच इतर विभागाच्या वतीने करण्यात येणा-या रस्ते, पूल, इमारती या क्षेत्रिय कामांची गुणवत्ता विषयक नमुना तपासणी करुन अहवाल निर्गमित करणे.

२. शासन व मुख्य अभियंता, स्तरावरुन प्राप्त झालेल्या कामांच्या तक्रारी बाबत चौकशी करुन संबंधीतांना अहवाल सादर करणे.

३. विविध बांधकाम साहित्याची जिल्हा प्रयोगशाळेतुन गुणवत्ता तपासणी करुन निष्कर्ष देणे.

४. माहीतीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागीतलेली माहीती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.

५. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

६. मंडळाची विविध माहीती “www.mahapwd.gov.in” या बेबसाईटवर उपलब्ध करणे.

**२.(१) बांधिलकी :-**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक

I. सेवेच्या गुणवत्तेशी बांधीलकी ठेवील.

II. सौजन्यपुर्व व मदतीची वृत्ती ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

III. पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध पत्रके नागरिकांच्या माहीतीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**२. (२) नागरिकांची जबाबदारी :-**

I. शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तवणुक सौजन्यपूर्वक असावी.

II. नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

III. विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

IV. नागरिकांशी कायदेशिर तरतुद, नियम व अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

**३. मंडळाची रचना :-**

या मंडळातर्गंत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण अधीक्षक अभियंता स्तरावर केले जाते.

या मंडळाच्या अधिपत्याखाली दक्षता कक्ष व गुणनियंत्रण कक्ष असे एकुण दोन कक्ष असून कार्यकारी अभियंता (धुळे, जळगांव, नंदुरबार) व कार्यकारी अभियंता (नाशिक, अहमदनगर) हे संबंधीत कक्षाची जबाबदारी सांभाळतात.

दक्षता व गुणनियंत्रण मंडळात ६ व जिल्हा प्रयोगशाळा ५ असे एकुण ११ उपअभियंता कार्यरत आहेत.

बांधकाम साहित्याच्या गुणवत्ता विषयक चाचण्या घेण्यासाठी धुळे, जळगांव, नंदुरबार, नाशिक व अहमदनगर जिल्हयांसाठी जिल्हा प्रयोगशाळा आहे. सहाय्यक संशोधन अधिकारी तथा उपअभियंता यांचे अधिपत्याखाली सदर प्रयोगशाळेचे कामकाज चालते. (सोबत तक्ता परिशिष्ट - अ जोडला आहे.)

४. मंडळाची वार्षिक उद्दीष्टे :-

शासन परिपत्रक क्र. २०१८ नुसार दक्षता व गुणनियंत्रण मंडळ  कक्ष व दक्षता व कक्ष यासाठी तपासणीचे स्वतंत्र वार्षिक मापदंड निश्चित करण्यात आलेले आहेत. संकीर्ण -२०१८/ प्र.क्र.१९१/रा.म..२/मंत्रालय, मुंबई-३२ दि.१९/१०/२०१८

| अ.क्र. | तपासणीचा प्रवर्ग | वार्षिक मापदंड |
|---|---|---|
| १. | कामांची नियतकालिक निरीक्षणे | १३८ |
| २ | कामांची आकस्मिक तपासणी | ४८ |
| ३ | क्षेत्रिय चाचण्यांचे पूर्नविलोकन | ३२ |
| ४ | कामावर गोळा केलेल्या साहित्यांचे चाचणी निष्कर्ष | २७ |
| ५ | तांत्रिक लेखा परिक्षण | ०५ |

या व्यतिरिक्त शासन अथवा मुख्य अभियंतास्तरावरुन आदेशित केलेली विविध अर्थसहाय्यीत योजनेतुन झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी या मंडळामार्फत करण्यात येते.

**५. प्रयोगशाळा व प्रशिक्षण :-**

या मंडळातर्गंत नाशिक, नगर, धुळे, नंदुरबार व जळगांव येथे जिल्हा प्रयोगशाळा असून या प्रयोगशाळेत शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्थाकडून प्राप्त विविध बांधकामास साहीत्यांचा चाचण्या सशुल्क करण्यात येतात व त्याव्दारे प्राप्त होणारा महसूल शासनास जमा करण्यात येतो.

तसेच या मंडळामार्फत क्षेत्रिय अधिकारी / कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात येऊन तांत्रिक ज्ञान अद्यावत ठेवण्यासाठी तसेच नवीन तांत्रिक बाबी क्षेत्रिय स्तरावर पोहचवण्याचा प्रयत्न केले जातात.

**६.(अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक :-**

बांधकामांची नियतकालिक तपासणी करुन पाहणी अहवाल निर्गमित करणे, शासन व मुख्य अभियंता स्तरावरुन प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत चौकशी करुन संबंधीत प्राधिका-यास चौकशी अहवाल सादर करणे तसेच जिल्हा / क्षेत्रिय प्रयोगशाळामध्ये प्राप्त झालेल्या बांधकाम साहीत्यांचे चाचणी निष्कर्ष / अहवाल संबंधीतांस देण्यासाठी लागणारा कालावधी कार्यपुर्तीच्या वेळापत्रकात (परिशिष्ठ - (ब) नमुद केला आहे.

**६.(ब) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण :-**

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी या मंडळाबाबत अथवा मंडळातर्गत असलेल्या जिल्हा / क्षेत्रिय प्रयोगशाळाबाबत असतील तर त्यासाठी नागरीकांनी ज्या विशिष्ठ कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रार केली असेल केली त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी. अशा गा-हाणी / तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ३० दिवसांत करण्यात येईल.

**६. (क) नागरिकांच्या सनदेचा आढावा** :-

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा सा. बां. विभागांकडुन घेण्यात येईल.

**६. (ड) जनसामान्यांकडुन सूचना :-**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहूमुल्य सूचनांचा गांभियपूर्वक विचार करुन, त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वत:हून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही.

## **७. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :-**


दक्षता व गुणनियंत्रण मंडळाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या या नागरिकांच्या सनदेची अमलबजावणी करण्यास हे मंडळ कटिबध्द आहे.

या सनदेस व्यापक प्रसिध्द देऊन, नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे निराकरण करण्यांत येईल.

# परिशिष्ठ "अ"

## अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक




# परिशिष्ट "ब"

## कार्यपुर्तीचे वेळापत्रक

| बाब | कार्यपुर्तीचा कालावधी |
|---|---|
| १. कामांची तपासणी करुन पाहणी अहवाल निर्गमित करणे | तपासणी दिनांकापासून ३० दिवसांचे आंत |
| २. बांधकाम साहीत्यांचे चाचणी निष्कर्ष / अहवाल संबंधीतांस देणे. | चाचणीच्या प्रकरानुसार ३० ते ६० दिवस |
| ३. शासन / मुख्य अभियंतास्तरावरुन प्राप्त तक्रारीबाबत चौकशी अहवाल | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाल्यास ९० दिवस |

(६)

**दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सार्वजनिक बांधकाम विभागातील कामांची तपासणी करण्याच्या वार्षिक मापदंडातील बदल.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१८/प्र.क्र.१९१/रा.म.२.**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १९ ऑक्टोबर, २०१८

**परिपत्रक** :-

सार्वजनिक बांधकाम विभागतील विविध योजनांतर्गत हाती घेतलेल्या रस्ते, पूल व इमारती बांधकामांच्या गुणवत्तेबाबतची तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळातर्फे करण्यात येते. या तपासणीसाठी शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०००/प्र.क्र. १३४/रा.म.२ दि. १५ मे २००२ नुसार मापदंड निश्चित करण्यात आले होते. तथापी सदर शासन परिपत्रकामध्ये विहित केलेल्या तपासणी प्रवर्गापैकी (अ) हजेरीपटांची तपासणी (ब), भांडार तपासणी व (क) निरीक्षण वाहणे, बांधकाम यंत्रे आणि कार्यशाळा तपासणी (ड) तांत्रिकी प्रशिक्षण वर्ग या प्रवर्गांची तपासणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळातर्फे केल्या जाणाऱ्या तपासणीमधून वगळून सदर मापदंडामध्ये फेरबदल करणे शासनाच्या विचाराधीन होते.

२. त्यानुषंगाने या परिपत्रकाव्दारे शासन आता असे आदेश देत आहे की, हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून दक्षता व गुणनियंत्रण मंडळाच्या विविध कामांचे सुधारीत वार्षिक मापदंड खालीलप्रमाणे असतील.

| अ.क्र. | तपासणीचे प्रवर्ग | अस्तित्वातील मापदंड | सुधारीत मापदंड |
|---|---|---|---|
| १ | कामांची नियतकालिक निरिक्षणे | १९१ | १३८ |
| २ | कामांची आकस्मिक तपासणी | ४८ | ४८ |
| ३ | क्षेत्रिय चाचण्यांचे पुनर्विलोकन | १८ | ३२ |
| ४ | कामावर गोळा केलेल्या साहित्यांचे चाचणी निष्कर्ष | २४ | २७ |
| ५ | तांत्रिक लेखा परिक्षण | ०९ | ०५ |
| ६ | हजेरीपटांची तपासणी | २४ | ०० |
| ७ | भांडार तपासणी | ०४ | ०० |
| ८ | निरिक्षण वाहने व बांधकाम यंत्रे आणि कार्यशाळा तपासणी | १० | ०० |
| ९ | तांत्रिक प्रशिक्षण वर्ग | १० | ०० |
| | **एकूण** | **३३८** | **२५०** |

३. नियतकालिक निरिक्षणाच्या मापदंडाची विगतवारी वेगवेगळया प्रवर्गाखालील कामांसाठी पुढीलप्रमाणे राहील, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | प्रवर्ग | अस्तित्वातील विगतवारी | सुधारीत विगतवारी |
|---|---|---|---|
| १ | मूळ बांधकामे व इतर | ३५ टक्के | ४० टक्के |
| २ | हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत रस्त्यांची कामे | ०० टक्के | २० टक्के |
| ३ | दुरूस्ती कामे | ३० टक्के | ३० टक्के |
| ४ | मिनी प्लॅन (मा. आमदार /मा.खासदार यांचा स्थानिक विकास कार्यक्रम) | १० टक्के | १० टक्के |
| ५ | रोजगार हमी योजना | ०५टक्के | ०० टक्के |
| ६ | जिल्हा परिषद कामे | २० टक्के | ०० टक्के |

४. विभागाकडून हाती घेतल्या जाणाऱ्या सर्व कामांची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी प्रामुख्याने क्षेत्रीय मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता,उप अभियंता व इतर तांत्रिक अधिकारी यांची आहे.तथापी दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून प्रातिनिधीक स्वरूपात तपासणी करण्यासाठी उपरोक्त मापदंड देण्यात आले असून त्यापैकी २५ टक्के कामांची तपासणी ही स्वत:अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन,नवी मुंबई यांनी करणे अनिवार्य राहील व तसे धारिकेवर स्पष्ट नोंद करणे आवश्यक राहील.

५ सदर मापदंडानुसार दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन वेळीच बांधकाम विभागाच्या संबधित कार्यकारी अभियंत्यांनी करावयाचे असल्यामुळे, कामांवरील गुणवत्ता राखण्यामध्ये प्रत्यक्ष सहभाग त्या-त्या विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा असणे क्रमप्राप्त आहे. त्याकरीता दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून करण्यात आलेल्या तपासणीतून निदर्शनास आणण्यात आलेले दोष त्वरीत दूर करून किंवा त्यांच्या निवारणार्थ आवश्यक कार्यवाही करणे, ही क्षेत्रीय अधिकाऱ्यांची प्राथमिक जबाबदारी आहे व ती सर्वकषरित्या तत्परतेने पार पाडणे बंधनकारक आहे.

६. सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध योजनांतर्गत रस्ते, पूल व इमारतीची बांधकामे करताना,काही वेळा कामाच्या गुणवत्तेबाबत किंवा खोटया अथवा जादा मोजमापांसंदर्भात तक्रारी प्राप्त होत असतात. अशा तक्रारींपैकी काही तक्रारींची चौकशी दक्षता व गुणनियंत्रण मंडळातील अधिकाऱ्यांकडून करण्यात येते. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की,अशा तक्रारींच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या चौकशी अहवालांमध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत ढोबळमानाने नमूद करण्यात येते. यास्तव अशा प्रकारच्या प्राप्त

तक्रारींच्या अनुषंगाने शासन परिपत्रक दगुमं १२/२००३/ प्र.क्र.३३३/सेवा-६ दि ३०/१०/२००३ अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार कामाची संयुक्त मोजणी करून घेवून त्यानुसार शासनाच्या आर्थिक नुकसानीची परिगणना अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उप अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांचे स्वाक्षरीसहीत धारिकेवर ठेवून चौकशी अहवालामध्ये नमूद करावी.

उपरोक्त सूचना हे परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८१०१९१२४५२२९२१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Satish Tukaram Kolikar
Date: 2018.10.26 15:56:46 +05'30'

**( सतीश कोळीकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व मुख्य अभियंते,
२) सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व अधीक्षक अभियंते (द.व गु.नि.मंडळासहित)
३) सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व कार्यकारी अभियंते(जि.प.सह)
४) सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालयातील सर्व अधिकारी,
५) सचिव (रस्ते) यांचे स्वीय सहाय्यक
६) सचिव (बांधकामे) यांचे स्वीय सहाय्यक
७) मुख्य अभियंता व सह सचिव यांचे स्वीय सहाय्यक
८) निवडनस्ती (राम-२).